# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

*(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

---

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ-नाशिक/व्दितीय अपिल क्र.१३८२/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| डॉ. वैशाली पंकज वीर, रा. मु.पो. आगसखिंड, ता. सिन्नर, जि. नाशिक - ४२२५०२ | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धार्डेदिगर, ता. कळवण, जि. नाशिक | विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, कळवण, ता. कळवण जि. नाशिक |

**सुनावणी दिनांक — २८/११/२०२४**

**१. उपस्थिती —**

| अपीलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपीलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

**२. द्वितीय अपील अर्ज —**

(१) द्वितीय अपील अर्जाचा दिनांक : ०९/०३/२०२२

(२) द्वितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अपेक्षित असलेली माहिती दिली नाही. प्रथम अपील सुनावणी घेतली नाही.

(३) द्वितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : कोणतीही विनंती करण्यात आलेली नाही.

**३. माहिती अर्ज —**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : १९/११/२०२१

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : १९/११/२०२१

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि.१५/०८/२००८ रोजीचा ग्रामपंचायत सभा ठराव क्र.०७ सत्यप्रत

**(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :**
दि.१५/०८/२००८ रोजीचा ग्रामपंचायत सभा ठराव क्र.०७ सत्यप्रत मिळावी.

**(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धार्डेदिगर, ता. कळवण, जि. नाशिक यांनी कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

**४. प्रथम अपील -**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २७/१२/२०२१

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २७/१२/२०२१

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : माहिती उपलब्ध करुन दिली नाही.

**(४) अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही :**
अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती कार्यालय, कळवण, ता. कळवण जि. नाशिक यांनी दि.१४/०२/२०२२ रोजी सुनावणी घेवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी आठ दिवसांत माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी, असे आदेश पारित केल्याचे दिसून येते.

५. **युक्तिवाद/लेखी खुलासा –**

१) विद्यमान जन माहिती अधिकारी - जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे कोणताही खुलासा सादर केलेला नसल्याचे दिसून येते.

६. **निष्कर्ष –**

१) अपीलार्थी यांना अद्यापही माहिती अप्राप्त असल्याचे दिसून येते.
२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील आदेश पारित केल्याचे दिसून येते.
३) अपीलार्थी सुनावणीस अनुपस्थित असल्याचे दिसून येते.
सबब, खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१) विद्यमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धार्डेदिगर, ता. कळवण, जि. नाशिक यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस त्यांच्या दिनांक १९/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहितीसंदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती / वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामुल्य पुरवावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपीलार्थी यांना पाठवावे.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, धार्डेदिगर, ता. कळवण, जि. नाशिक यांनी अपीलार्थी यांच्या दि.१९/११/२०२१ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही. तसेच प्रथम अपील निर्णयानंतरही अपीलार्थीस माहिती पुरविल्याचे दिसून येत नाही. म्हणून त्यांच्याविरुध्द माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० नुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आयोगाकडे सादर करावा. विहीत मुदतीत त्यांचा लेखी खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास त्यांचे या प्रकरणी काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक.१३८२/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(भुपेंद्र गुरव)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

जावक क्र. ३४३७ — दिनांक :- 14 MAY 2025